## थोडक्यात

### महिलेचा विनयभंग व पतीला मारहाण

**शिक्रापूर :** चिंचणी ता. शिरुर येथून महिला महिलेच्या पतीसोबत दुचाकीहून चाललेली असताना पाठीमागून एका कार मधून राघू डोम्बे हा इसम आला त्याने महिलेच्या दुचाकीला कार आडवी लावून महिलेचा हात पकडून महिलेच्या मनास लज्जा निर्माण होईल असे कृत्य केले, दरम्यान महिलेचा पती महिलेला सोडवायला आला असता राघू याने महिलेच्या पतीला देखील शिवीगाळ, दमदाटी करत हाताने मारहाण केली त्यांनतर लगेचच कार मधून लोखंडी गज घेऊन महिलेच्या डोक्यात मारून महिलेला जखमी केले, याबाबत पिडीत महिलेने शिरुर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी राघू जयसिंग डोम्बे रा. खोर ता. दौंड जि. पुणे याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक जोतीराम गुंजवटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार विशाल कोथळकर हे करत आहे.

### केळगावात भारतीय खेळ प्राधिकरण तर्फे मुलींसाठी निवड चाचणी

**आळंदी :** भारत सरकारच्या भारतीय खेळ प्राधिकरण तर्फे केळगाव येथील जोग महाराज व्यायामशालेत मुलींसाठी १८ व १९ एप्रिल रोजी निवड चाचणी आयोजित करण्यात आली असल्याची माहिती आंतरराष्ट्रीय कुस्ती पंच आणि मार्गदर्शक दिनेश गुंड यांनी दिली आहे.

या निवड चाचणीत निवड होणाऱ्या मुलीना दरम्हा १ हजार रुपये क्रिडा शिष्यवृत्ती, ट्रॅकसूट, शूज, टी शर्ट , ट्रॅव्हल बॅग्, वैध्यकीय सुविधा स्पोर्ट्स ऑथॉरिटी ऑफ् इंडिया कडून देण्यात येणार आहेत. निवड चाचणीत सहभाग घेणा-या मुलींचे वय ११ ते १६ दरम्यान असावे. सहभाग घेणाऱ्या मुलीनी १८ एप्रिलला सकाळी १० वाजतां हजर रहावे असे आवाहन करण्यात आले आहे. भारतीय खेळ प्राधिकरणाचे गौरव आर्या, आंतरराष्ट्रीय कुस्ती पंच आणि मार्गदर्शक दिनेश गुंड, शिव छत्रपती पुरस्कार प्राप्त अंकिता काटे, शेखर यादव हे निवड समिती सदस्य म्हणून काम पाहणार आहेत.

# अलंकापुरीत श्रीराम जन्मोत्सवास भाविकांची गर्दी संगीत, नृत्य, भजन, नारदीय कीर्तन श्रवण पर्वणी



**आळंदी / प्रतिनिधी**

**श्री आवेकर भावे रामचंद्र संस्थान ट्रस्ट संस्थापिका कै. चंद्रभागाबाई आवेकर यांनी इंद्रायणी किनाऱ्यावर श्री राम मंदिर सन १८४० मध्ये लक्षवेधी बांधले. श्रीराम मंदिरात श्रींचा जन्मोत्सव १८४ वे वर्ष साजरे करीत आहे.**

येथील श्री आवेकर भावे रामचंद्र संस्थान ट्रस्ट संस्थापिका कै. चंद्रभागाबाई आवेकर यांनी इंद्रायणी किनाऱ्यावर श्री राम मंदिर सन १८४० मध्ये लक्षवेधी बांधले. श्रीराम मंदिरात श्रींचा जन्मोत्सव १८४ वे वर्ष साजरे करीत आहे. आळंदी पंचक्रोशीतील भाविकांनी श्री राम नवमी निमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन आवेकर भावे रामचंद्र संस्थान चे वतीने करण्यात आले आहे.

श्री राम मंदिरात राम नवमी निमित्त १७ एप्रिल पर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांचे परंपरेने उत्साहात आयोजन करण्यात आले आहे. विविध धार्मिक कार्यकमांत संगीत, नृत्य, भजन, नारदीय कीर्तन ९ ते १७ एप्रिल या कालावधीत होत असल्याचे आवेकर भावे रामचंद्र संस्थानचे सरपंच संजय आवेकर यांनी सांगितले.

या धार्मिक उत्सव पर्वणीत ह. भ. प. वासुदेवबुवा बुरसे यांची नारदीय कीर्तन सेवा सुरु आहे. यास गायक श्यामजी गो-हाणे ( तबला ) , नाना पांढरे ( हार्मोनियम ) साथ देत आहेत.

श्रीराम जन्मोत्सव सोहळ्यात डॉ. परिमल फडके यांचे भरतनाट्यम कार्यक्रमास उपस्थितांची मोठी दाद मिळाली. ह. भ. प. ज्ञानेश्वरी रोकडे, पंढरीनाथ रोकडे, निवृत्ती महाराज दाभेकर यांची भजन सेवा त्यानंतर गीतरामायण स्वरांजली उत्साहात झाली. मुक्ता कुलकर्णी यांनी श्रीरामाचे भक्तवैभव सादर केले. सुनीता गुणे यांनी गीत सुद्धा रामायण सादर केले. आबासाहेब गोडसे, निवृत्ती गोडसे यांनी वारकरी भजन सेवा रुजू केली. आरती सरदेसाई यांचे भक्तीगीत व भावगीत सादरीकरण झाले.

शनिवारी ( दि.१३ ) अभिषेक तेलंग श्रीरामाची गाणी, वैभव दातार अपरिचित रामायण सादर करणार आहेत. रविवारी ( दि. १४ ) दत्ता चितळे आणि सहकारी यांचे गीतरामायण होईल. सोमवारी ( दि. १५ ) ज्योती गो-हाणे, सोहं गो-हाणे आपल्या मंत्रमुग्ध करणाऱ्या वनिवुन अभंग आणि भक्तिगीते सादर करतील. मंगळवारी ( १६ ) राधाकृष्ण महाराज गरड भजन सेवा, अंतर्यामी सूर पं. श्रीनिवास खळे यांनी स्वरबद्ध केलेली गाणी होणार आहेत. यावेळी अभिजित पंचभाई, दीप्ती कुलकर्णी आणि सहकारी साथ सांगत देणार आहेत. बुधवारी ( दि. १७ ) रोजी श्रीराम जन्मोत्सवावर आधारित बुरसे महाराज यांची नारदीय कीर्तन सेवा, महाप्रसाद वाटप आणि संध्याकाळी साडेपाच वाजता श्री रामाची पालखी नगरप्रदक्षिणा होऊन रामजन्मोत्सवाची सांगता होईल.

## आंद्रा धरणातून पुन्हा ८० एमएलडी पाणी मिळण्यास सुरुवात

**पुणे :** आंद्रा धरणातून पुन्हा ८० एमएलडी पाणी मिळण्यास सुरुवात झाली आहे. परंतु, अपुरा, कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी कायम आहेत.

आंद्रा धरणातून मिळणा-या पाण्यात मोठी घट झाली होती. चार दिवस २१ एमएलडी पाणी शहरासाठी मिळाले होते. पाण्याची तूट निर्माण झाल्याने समाविष्ट गावांसह उपनगरांमध्ये पाणी समस्या भीषण झाली होती. वाकड, थेरगाव, ताथवडे, पुनावळे, च-होली, मोशी, डुडुळगाव या उपनगरांमध्ये पाणी समस्या गंभीर झाली होती. महापालिका प्रशासनाने पाटबंधारे विभागाच्या अधिका-यांशी चर्चा केली. त्यानुसार पूर्वीप्रमाणे ८० एमएलडी पाणी मिळण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे पाणीपुरवठा पूर्ववत झाला आहे. मात्र, तक्रारी कायम आहेत. शहरवासीयांना मावळातील पवना धरणातून आणि आंद्रा धरणातून पाणीपुरवठा केला जातो. महापालिका दिवसाला पवना धरणातून ५२०, आंद्रातून ८० आणि औद्योगिक विकास महामंडळाकडून १५ असे ६१५ दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणी उचलते. त्यानंतरही पाणीपुरवठ्याच्या तक्रारी कायम आहेत.

## बोपोडी ते खडकी बाजार मार्गे वाहतूक वळविल्याने अपघातात वाढ, वाहतूक पूर्ववत करण्याची मागणी

**पुणे :** मेट्रोचे काम पूर्ण झाल्याने खडकी बाजार मार्गे वळविण्यात आलेली वाहतूक जुन्या मुंबई-पुणे मार्गवरून पूर्ववत करण्यात आल्याने खडकीकरांनी सुटकेचा निःश्वास सोडला होता. मात्र, पुन्हा ही वाहतूक बोपोडीतून खडकीमार्गे वळविल्याने वाहतूक कोंडी होऊन अपघातात वाढ झाली आहे. त्यामुळे ही वाहतूक पूर्ववत करून खडकीकरांची वाहतूक कोंडी व अपघातांमधून मुक्तता करावी, अशी मागणी नागरिकांमधून होऊ लागली आहे. जुन्या पुणे मुंबई रस्त्यावरील वाहतूक बोपोडी-खडकी बाजारमार्गे ऑल सेंट स्कुलजवळून वळविण्यात आल्याने मोठी वाहतूक कोंडी होत असून, सांगवी, पिंपळे गुरवमधून पुण्यात जाण्यासाठी नागरिकांना उशीर होत आहे. त्यामुळे किमान येथील वाहतुकीचे नियोजन करण्याची आवश्यकता आहे. वाहनांमुळे खडकीमधील नागरिकांना वाहतूक कोंडी सोबतच अपघातांचाही सामना करावा लागत आहे. तसेच या वाहतुकीचा फटका खडकी बाजार परिसरातील अनेक शाळांतील विद्यार्थ्यांना बसत आहे. सांगवी, पिंपळे गुरव, बोपोडीतून खडकी बाजार परिसरातील लालबहादूर शास्त्री शाळा, आलेगावकर शाळा, एस.व्ही.एस. स्कुल, सेंट जोसेफ स्कुल, तसेच पुण्यात जाणाऱ्या विद्यार्थ्यांना बसत आहे. दररोज तास-दोन तास वाहतूक कोंडीत विद्यार्थ्यांना अडकून पडावे लागत आहे. त्यातच उन्हाळा असल्याने उष्णतेचा त्रास सहन करावा लागत आहे.

बोपोडी ते खडकी स्टेशन दरम्यान मेट्रोचे काम दोन वर्षांपासून सुरू आहे. त्यामुळे जुन्या पुणे-मुंबई मार्गावरील वाहतूक बोपोडीतून खडकी बाजार मार्गे वळविण्यात आली आहे. या मार्गावर किर्लोस्कर ऑइल इंजिन कंपनी, झोपडपट्टीही आहे. त्यामुळे नागरिकांची मोठी वर्दळ असते. त्यातच विद्यार्थ्यांची आणि पालकांची वर्दळ असते. पेन्शनर ज्येष्ठ नागरिक, महिला, कंपनीतील कामगार आदी सर्वांना नित्याच्या वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे.

छावा मराठा संघटनेचे पुणे जिल्हाप्रमुख रामभाऊ जाधव म्हणाले, खडकीमधून वळविण्यात आलेल्या वाहतूक कोंडीचा सर्वाधिक फटका स्थानिक नागरिकांना सहन करावा लागत आहे. दोन दिवसापूर्वी या वाहतुकीमुळे एका पादचाऱ्याला जीव गमवावा लागला आहे. असे अनेक अपघात गेल्या दीड वर्षांपासून घडत असूनही वाहतूक पोलिसांकडून ठोस नियोजन केलेले दिसत नाही. हे टाळण्यासाठी वाहतूक पोलिसांनी वाहतुकीचे योग्य नियमन करण्याची गरज आहे. अन्यथा छावा मराठा संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

## कार्यक्रमातून पाच महिलांचे दागिने चोरी

**शिक्रापूर / प्रतिनिधी**

सणसवाडी ता. शिरुर येथील शिवम मंगल कार्यालय जवळ स्वामी समर्थ मंदिरात धार्मिक कार्यक्रम असल्याचे हजारो महिला या कार्यक्रमासाठी हजर असताना कुसुम दरेकर या महिलेच्या गळ्यातील गंठण चोरी गेल्याचे महिलेच्या लक्षात आल्याने त्यांनी आयोजकांना माहिती दिल्यानंतर आयोजक मुख्य गेट बंद करुन महिलांची चौकशी करत असताना सुनंदा सखाराम पावणे या महिलेच्या गळ्यातील गंठण चोरीला गेल्याचे समोर आल्याने खळबळ उडाली मात्र यावेळी सर्व महिलांना दागिने तपासण्यासह सांभाळण्याचे आवाहन केले असता कुसुम काळूराम दरेकर व सुनंदा सखाराम पावणे यांच्यासह अजूनही रेणुका महेश कुऱ्हे, मनीषा आकाश नरोडे व चंद्रभागा भोगीलाल दरेकर महिलांचे दागिने चोरीला गेल्याचे समोर आले, मात्र यावेळी अचानक एक महिला घाईघाईने पाठीमागे जाऊन भिंतीवरुन पळून जाण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसून आल्याने अन्य महिलांनी त्या महिलेला पकडले असता तिला एक इसम मदत करत असल्याचे दिसले मात्र यावेळी त्या महिलेसह इसमाने महिलांचे दागिने चोरून त्यांच्या साथीदारांकडे दिले आणि त्यांचे साथीदार फरार झाल्याचे उघड झाल्याने, याबाबत कुसुम काळूराम दरेकर वय ४९ वर्षे रा. सणसवाडी ता. शिरुर जि. पुणे यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी सुनित्रा जयाजी मिसाळ व जयाजी सूपडाजी मिसाळ दोघे सध्या रा. कासारी ता. शिरुर जि. पुणे मूळ रा. दुधड ता. संभाजीनगर जि. संभाजीनगर यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक वेरणनाथ मुत्तनवार हे करत आहे.

## गॅसचा काळाबाजार केल्याप्रकरणी तरुणावर गुन्हा दाखल

**शिक्रापूर / प्रतिनिधी**

गॅसचा काळा बाजार करणाऱ्या १९ वर्षीय तरुणावर रावेत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई गुन्हे शाखा युनिट ५ ने बुधवारी रावेत येथील जय मल्हार गॅस सेल्स सर्वीस दुकानात केली आहे.

रामेश्वर भारत शिळे (वय १९ रा.रावेत) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी रावेत पोलीस ठाण्यात पोलीस शिपाई भरत माने यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी हा घरगुती गॅस सिलेंडरमधून लोखंडी रिफील नोजलच्या साहाय्याने गॅस बाहेर काढत होता. यावेळी त्याने कोणतीही खबरदारी पाळली नव्हती. या कारवाईत १६ हजार ७०० रुपयांचा गॅस जप्त केला .रावेत पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

## पोलिसांच्या तावडीतून पाळलेला आरोपी पुन्हा जेरबंद

**शिक्रापूर / प्रतिनिधी**

सणसवाडी ता. शिरुर येथील मोबाईल चोरी प्रकरणात नागरिकांनी पकडून पोलिसांच्या हवाली केलेल्या आरोपीने अटकेनंतर वैद्यकीय तपासणीसाठी नेल्यानंतर ग्रामीण रुग्णालय शिक्रापूर येथून पलायन केले मात्र पोलिसांनी पुन्हा सकाळच्या सुमारास त्याला अटक केल्याची घटना घडल्याने ओंकार रामकृष्ण गायकवाड याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सणसवाडी ता. शिरुर येथे महेंद्रकुमार मिश्रा हे रात्रीच्या सुमारास मोबाईलवर बोलत असताना पाठीमागून आलेल्या दोघांनी त्यांचा मोबाईल हिसकावून पळून जाताना मिश्रा यांनी आरडाओरडा केल्याने नागरिकांनी दुचाकीवरील ओंकार गायकवाड याला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले होते, तर महेंद्रकुमार राघवेंद्र मिश्रा वय ३५ वर्षे रा. गव्हाळवस्ती सणसवाडी ता. शिरुर जि. पुणे मूळ रा. बरही ता. हनुमना जि. रिवा मध्यप्रदेश यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी ओंकार रामकृष्ण गायकवाड याच्यासह त्याच्या साथीदारा विरुद्ध गुन्हा दाखल करत ओंकार गायकवाड याला अटक केली होती, त्यांनतर ११ एप्रिल रोजी रात्रीच्या सुमारास ओंकार गायकवाड याची वैद्यकीय तपासणी करण्यासाठी पोलीस हवालदार लहानू बांगर व पोलीस नाईक अतुल पखाले यांनी ग्रामीण रुग्णालय शिक्रापूर येथे नेलेले असताना पोलिसांच्या हाताला झटका देऊन अंधाराचा फायदा घेऊन ओंकार पळून गेला मात्र त्यांनतर शिक्रापूर पोलिसांनी पुन्हा रात्रभर शोध मोहीम राबवत सणसवाडी येथे आलेल्या ओंकारला ताब्यात घेत पुन्हा गुन्हा दाखल करत अटक केली असून याबाबत पोलीस नाईक अतुल बाळासाहेब पखाले रा. शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पोलिसांनी ओंकार रामकृष्ण गायकवाड वय २० वर्षे रा. सणसवाडी ता. शिरुर जि. पुणे मूळ रा. मोरगाव ता. बारामती जि. पुणे याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ कचरे हे करत आहे.

## वर्गात दंगा केला म्हणून शिक्षिकेने विद्यार्थ्याला केली बेदम मारहाण

**पुणे :** वर्गात काही विद्यार्थी घोळका करून बसत दंगा करत असल्याने शिक्षिकेने एका विद्यार्थ्याला बेदम मारहाण केल्याचा प्रकार पुण्यातील शाळेत घडला आहे. हा मारहाणीचा प्रकार विद्यार्थ्यांनी मोबाईलमध्ये कैद केला. दरम्यान, हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या पालकांनीही तो पाहिला त्यानंतर त्यांनी विश्रामबाग पोलिसांत शिक्षकेविरुद्ध तक्रार दाखल केली. शिक्षिकेनं मुलाला मारहाण करण्याचा प्रकार गंभीर असून त्याबाबत शिक्षण संस्थेनं त्यांना बडतर्फ करावं. यापूर्वी देखील या शिक्षिकेनं बऱ्याच मुलांना मारहाण केली आहे, असा आरोपही पालकांनी केला आहे.

**Change of Name**

I have changed my name from SHAILESH D A S H A R A T H KHEDKAR to SHAILESH DASHRATH KHEDKAR, as per Affidavit dated 12/04/2024

**जाहीर नोटीस**

सर्वसाधारणपणे जनतेला जाहीर नोटीसीच्या माध्यमातून कळविण्यात येते की, कोटक महिंद्रा बँक लिमिटेडने खाली दिलेल्या वाहनांचा लिलाव आयोजित केला आहे.
१-सीबी **EXCAVATOR 922 D HD OF LIUGONG LGC922DZTJC109997**
वायओएम -२०१९ किमान राखीव किंमत : १८,५८,९५३/-
मेसर्स कोटक सह महिंद्रा बँक त्याच्या हायपोथकेशन अंतर्गत विक्री करत आहे. गाडी ज्या स्थितीत आहे, त्या स्थितीत विक्री करण्यात येईल.
इच्छुक खरेदीदारांनी खालील पत्त्यावर ऑनलाईन/ऑफलाईन पद्धतीने शाखेच्या पत्त्यावर १५ दिवसांच्या आत किंवा २७. ०४. २०२४ पूर्वी त्यांचे कोटेशन देऊ शकतात. शाखेचा पत्ता : कोटक महिन्द्रा बँक लिमिटेड, न्याती युनिट्री, चौथा मजला, झोन पश्चिम-३, सम्राट अशोक रोड, (नगर रोड,) गुंजन कार्नर, येरवडा पुणे-४११००६ किंवा

**संपर्क : योगेश नितुरे**
**कोटक महिंद्रा बँक लि.**
**संपर्क/९७६४४४४५७६ ईमेल : yogesh.niture@kotak.com**

**एल&टी फायनान्स लिमिटेड**
(आधीचे नाव, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
**नोंदणीकृत कार्यालय:** एल&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177 कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
**CIN No.:** L67120MH2008PLC181833
**शाखा कार्यालय:** पुणे

L&T Finance

**तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी जाहीर लिलाव**

एल&टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी वित्तीय मालमत्ता पुनर्रजना आणि अनामत व्याजाची सक्तवसुली कायदा, 2002 [54 चा 2002] अंतर्गत आणि सदर कायद्यांतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून आपली थकबाकी आणि पुढील व्याज, आकार आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **''सार्वजनिक ई-लिलावाद्वारे'' ''जिथे आहे जसे आहे तत्वावर''** आणि **''ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत तत्वावर''** खालील मालमत्तेचा ई-लिलाव करीत आहेत.

| कर्जदार आणि सह-कर्जदाराचं नाव | तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता | कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक) | भौतिक ताबा घेतला | बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये) | एकूण शिल्लक थकबाकी 06.04.2024 नुसार | आरक्षित किंमत (रुपयांमध्ये) | आरंभाची तारीख | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. सोमवीर 2. संतोष कुमारी | मालमत्तेचा पत्ता:- फ्लॅट नं.डी1-101 क्षेत्रफळ 36.23 चौरस मीटर्स चईर्ट क्षेत्रफळ त्यासोबत बंदिस्त बाल्कनी जिचं क्षेत्रफळ चौरस 7.65 मीटर्स आहे आणि त्यापुढे एकत्रितपणे अ‍ॅटॅच्ड बाल्कनी 0.00 चौरस मीटर्स आणि त्यापुढे एकत्रितपणे ओपन टेरेसचा खास अधिकार आहे, जी आय लेवलला असून 5.79 चौरस मीटर्सचं क्षेत्रफळ आहे, जे इथे आहे: पहिला मजला, बिल्डिंग नं. डी1, ''एक्सआरबिया आयफेल सिटी-पीएच-आय'' कॉम्प्लेक्स, गट नं. 1527/2, तळेगाव रोड, चाकण, महाराष्ट्र 410501 | H168702007190350 03 आणि H168702007190350 03L | 22 जानेवारी 2024 | रु. 1,94,328/- | रु. 30,23,120.03/- | रु. 19,43,280/- | 27-04-2024 | 03-05-2024 रोजी सकाळी 10 ते सायंकाळी 5:30 |
| 1. राम शंकर मौर्य 2. निशादेवी राम मौर्य | मालमत्तेचा तपशील:- फ्लॅट नं.701, क्षेत्रफळ 27.02 चौरस मीटर्स चटई क्षेत्रफळ सोबत बंदिस्त बाल्कनी क्षेत्रफळ 3.00 चौरस मीटर्स आणि त्यापुढे जोडलेली बाल्कनी 0.00 चौरस मीटर्स आणि त्यापुढे 1.52 चौरस मीटर्सची टेरेस, सातवा मजला, बिल्डिंग नं. ''A5'', ''एक्सआरबी आंबी-पीएच-आय'', गाव आंबी, तालुका मावळ, जिल्हा पुणे, महाराष्ट्र, भारत 410507 | MUMHL18001746 आणि MUMHL18001747 | 19 जानेवारी 2024 | रु. 1,44,734.40/- | रु. 27,54,226.32/- | रु. 14,47,344/- | 27-04-2024 | 03-05-2024 रोजी सकाळी 10 ते सायंकाळी 5:30 |
| 1. महेश मांझी 2. रिना महेश मांझी | मालमत्तेचा तपशील:- फ्लॅट नं. 406, क्षेत्रफळ 33.51 चौरस मीटर्स चटई क्षेत्रफळ, पहिला मजला, बिल्डिंग नं.''b6'', ''एक्सआरबीआय हिंजवडी रोड-पीएच-आय'' ज्यासोबत बंदिस्त बाल्कनी जिचे क्षेत्रफळ 2.85 चौरस मीटर्स आणि त्यासोबत अ‍ॅटॅच्ड बाल्कनी जिचे क्षेत्रफळ 1.76 चौरस मीटर्स आणि त्यापुढे 1.89 चौरस मीटर्सच्या ओपन टेरेसचा खास अधिकार, गाव बेबाडोहल, तालुका मावळ, जिल्हा पुणे, महाराष्ट्र, भारत 410406 (गट नं.1 आणि 3) | H16622310720042401/H16622310720042401L/H16622310720042401G | 12 फेब्रुवारी 2024 | रु. 1,75,392/- | रु. 29,09,151.52/- | रु. 17,53,920/- | 27-04-2024 | 03-05-2024 रोजी सकाळी 10 ते सायंकाळी 5:30 |

**सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम**

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **02/05/2024** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुराव्यांच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10% परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTHF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **03/05/2024** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **04/05/2024** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेचे निरिक्षण किंवा आणखी माहितीसाठी, संभाव्य बोलीदारांनी अधिकृत अधिकाऱ्यांना संपर्क करावा म्हणजे मालमत्तेचे निरिक्षण किंवा आणखी माहिती, संभाव्य बोलीदारांनी अधिकृत अधिकाऱ्यांना म्हणजे **''नाव - शेखर काळे, एल&टी फायनान्स लि. - ऑफिस क्रमांक 301, तिसरा मजला, जेनिथ कॉम्प्लेक्स, साकार संकुल जवळ, शिवाजी नगर, पुणे - 411005, आणि संतोष तिवारी, संपर्क क्रमांक 9920490126, एल&टी फायनान्स लि. - ऑफिस: 6वा मजला, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीस शोरुमजवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098.''** या पत्त्यावर संपर्क साधावा. ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी बोली/प्रस्ताव स्विकारू/नाकारू/बदल/रद्द करु शकतात किंवा कोणतेही कारण न देता आणि पूर्वसूचना न देता ई-लिलावपुढे नेऊ शकतात.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8(6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक)/सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

**दिनांक:** 13.04.2024
**ठिकाण:** पुणे

स्वाक्षरी/-
**अधिकृत अधिकारी**
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड

**मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अशोक विठ्ठल सोनवणे** यांनी शितल प्रिंटर्स, भूषणनगर, पोस्ट केडगाव (देवी) तालुका आणि जिल्हा अहमदनगर पिन-४१४००१ (महाराष्ट्र) येथे दैनिक लोकमंथन मुद्रित केले. व ४३१ सोमवार पेठ, सिद्धीविनायक केशर पुणे पिन नंबर ४११०११ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ✻ व्यवस्थापकीय संपादक - रंजन साळवी. RNI : MAHMAR/2011/40983. Email - lokmanthan.pune@gmail.com